# BDC LIBRARY

## New Paper Clipping

*A.Y. 2024-2025*

# पुस्तकाचा गंध आयुष्याला सुगंधित करतो : चंद्रहार निकम

▲ **पाटण, दि. २० :** पुस्तक वाचत असताना मुखपृष्ठापासून मलपृष्ठापर्यंत वाचले पाहिजे व समजून घेतले पाहिजे. विद्यार्थिदशेत असताना विद्यार्थ्यांनी वाचन केले पाहिजे कारण पुस्तकाचा गंध आपल्या आयुष्याला सुगंधित करत असतो, असे मत नागोजीराव पाटणकर स्मारक वाचनालयाचे अध्यक्ष चंद्रहार निकम यांनी व्यक्त केले.

बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण मराठी विभाग व श्री. नागोजीराव पाटणकर स्मारक वाचनालय आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत पुस्तक परीक्षण कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी आयक्यूएसी समन्वयक डॉ. सौ. एच. व्ही. काटे होत्या. यावेळी मराठी विभाग प्रमुख प्रो. डॉ. पांडुरंग ऐवळे, डी. के. देशमुख, डॉ. विनायक राऊत यांची उपस्थिती होती.



मार्गदर्शन करताना चंद्रहार निकम, व्यासपीठावर डॉ. सौ. एच. व्ही. काटे, डॉ. पांडुरंग अहिवळे, डी. के. देशमुख, डॉ. विनायक राऊत.

चंद्रहार निकम म्हणाले, वाचाल तर वाचाल हा वाक्प्रचार वाचनाचा महत्त्वाचा संदेश देतो. वाचन करणे म्हणजे ज्ञान मिळवणे, विचार करायला शिकणे. वाचनाने व्यक्तिमत्त्व विकास साधता येतो तसेच वेळेचे व्यवस्थापन याबाबत पोमोडोर या इटालियन टेक्निकची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.

डॉ. सौ. काटे म्हणाल्या, वाचनाने विचार प्रगल्भ होतात. वाचन केल्याने मानवाच्या व्यक्तिमत्वाचा अंतर्बाह्य विकास होतो तसेच त्यांनी साने गुरुजी यांच्या श्यामची आई या पुस्तकातील एक प्रसंग सांगितला.

याप्रसंगी अल्मास मुल्ला, अक्षता मोरे, गुलशन सय्यद, जयश्री भिसे, नाजनीन मुल्ला, सानिका मोळावडे, सुप्रिया देसाई, मिनाज आतार या विद्यार्थ्यांनी पुस्तक परीक्षण वाचून दाखविले. गुलशन सय्यद हिने प्रास्ताविक केले. अक्षता मोरे हिने आभार मानले. जयश्री भिसे हिने सूत्रसंचालन केले. पुस्तक परीक्षण कार्यक्रमास प्रा. एस. डी. गायकवाड, प्रा. बळीराम लोहार तसेच बी. ए. व बी.कॉम.चे विद्यार्थी उपस्थित होते.